PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chakke Panje
Year: 1987

Song: Takala Jata Bhand Lapvta
Lyricist:

वेणी न् कुंकू बांगडी लेवून
उभी मी तुमच्या पुढं
हो...
सोवळयाचं ओवळं न् सुलटयाचं उलटं
कसं हे इपरित घडं
ताकाला जाता भांडं लपवता
हो ताकाला जाता भांडं लपवता
मनचा हेतू टाळू नका
असे छक्के पंजे खेळू नका
असे छक्के पंजे खेळू नका
इकडं गंमत तिकडं गंमत
म्हातारा झालाय चळू नका
आहो म्हातारा झालाय चळू नका
होय होय होय होय होय
असे छक्के पंजे खेळू नका
असे छक्के पंजे खेळू नका

लावणी वाचून तमाशा न्हाई
हे हे हे...
हो लावणी वाचून तमाशा न्हाई
तमाशा वाचून सारं सुनं
पोळी बी खावी नळी फोडावी
हो पोळी बी खावी नळी फोडावी
जग बदलूनी जगा जिणं

घोटभर घेऊन पोट भरावं
हो घोटभर घेऊन पोट भरावं
खातेऱ्यामंधी लोळू नका
असे छक्के पंजे खेळू नका
घरात चिडीचूप रानात गूपचूप
आई नी बायका पाळू नका
आई नी बायका पाळू नका
आरा रा रा रा रा...
असे छक्के पंजे खेळू नका
असे छक्के पंजे खेळू नका

नऊवारीची लज्जत न्यारी
नऊवारीची लज्जत न्यारी
मॅक्सीमंधी येणार न्हाय
मॅक्सीमंधी येणार न्हाय
चिकन तंदूरी खाणाऱ्याला
पोळी न् भाजी जमणार न्हाय
चिकन तंदूरी खाणाऱ्याला
पोळी न् भाजी जमणार न्हाय
मावा न जर्दा विडयात घालून
मावा न जर्दा विडयात घालून
लई जिभंवर घोळू नका
असे छक्के पंजे खेळू नका
असे छक्के पंजे खेळू नको

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*